# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 06/07/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील गांधी चौक कन्हान येथे दिनांक 04/07/2021 चे 22.15 वा. ते 23.15 वा. दरम्यान कन्हान पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन कन्हान पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 31/ एजी – 0117 क्रमांकाच्या ओमनी गाडीला थांबवुन चेक केले असता गाडी मध्ये एकुण 04 (गाई,गोरा) कि. 48,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– निलेश अशोकराव निस्वादे, वय 34 वर्ष, रा. वडाळा ता. आष्टी, जि. वर्धा, ह. मु. नागसेन नगर याच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 1,68,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई संजय बरोदिया, पो.स्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(अ)(ड)(इ)(एफ)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 9, 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक राहुल रंगारी मो.क्र. 9527131556 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत वडोदा शिवार कामठी येथे दिनांक 04/07/2021 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी व स्टाफ पो. स्टे मौदा परीसरात पेट्रोलिंग करीता फिरत असता वडोदा शिवार कामठी येथे आरोपी क्र. 1. आबिद शमीन अख्तर, वय 27 वर्षे, रा. शेख बुनकर कॉलोनी कामठी व 2. नसिम खान ईस्माईल खान, वय 32 वर्षे, रा. सेलाब नगर कामठी हे एमएच– 20/ डीई– 7617 क्रमांकाचा ट्रकमध्ये गोवंशाची कत्तलीकरीता अवैधरीत्या निर्दयतेने कोंबून वाहतुक करून नेण्याच्या तयारीत होते. फिर्यादी व स्टाफ तेथे गेले असता सदर ट्रकची पाहणी केली असता त्यामध्ये 26 गोवंश कि. 2,60,000/– रू. व एमएच– 20/डीई– 7617 क्रमांकाचा ट्रक कि. 25,00,000/–रू. असा एकुण 27,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई जितेन्द्र माधोराव हलमारे पोलिस मुख्यालय ना. ग्रा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)बी 11(1)क, 11(1), 11(1)ए प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 184 मोवाका, सहकलम 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकुर मो.क्र 7083151993 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर